**MHNG02-003656-2016**

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११७२/२०१६ मधील नि.क्र. १७५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दाव्यात झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करणेकामी केला आहे.

२. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, सदर प्रतिवादी तर्फे साक्षीदार पुढीत तपासास गैरहजर राहिल्याने दुस–या सत्रात पुरावा बंदचे आदेश पारीत केले. मात्र त्यानंतर त्वरीतच प्रतिवादी क्र. १ ते ५ ने सदर अर्ज केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी पुरावा देण्यास कारण दाखवले आहे. प्रकरण गुणदोषांवर निकाली होण्याकरिता प्रतिवादी क्र. १ ते ५ यांस पुरावा देण्याची संधी देणे गरजेचे आहे. न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजुर करणे संयुक्तीक वाटते. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे:

**आदेश**

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. १ ते ५ ने उदया सकाळी ११ वाजता न्यायालयात तपासाकरीता उपस्थित राहावे. उभयपक्षांनी त्यानंतर त्वरीत तपास चालू करावा.

४) प्रकरण कालबद्ध असल्याने कोणत्याही मोघम कारणास्तव प्रतिवादी क्र. १ ते ६ अथवा वादी यांना यापुढे प्रकरणात तहकुबी मिळणार नाही. तहकुबीचा कोणताही अर्ज प्रतिज्ञापत्राद्वारेच अभिलेखावर दाखल करण्यात येईल याची उभयतांनी नोंद घ्यावी.

६) आदेशाची उभयपक्षांनी नोंद घ्यावी.

PRITESH CHANDRASHEKHAR DESHPANDE
Digitally signed by PRITESH CHANDRASHEKHAR DESHPANDE
Date: 2026.08.10 15:51:09 +0530

दि. १०.०८.२०२६ **( प्रितेश देशपांडे )**

स्थळः नागपूर २१वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

नागपूर